# गुणवत्ता शिष्यवृत्ती 'विवेकानंद' प्रथम

**कोल्हापूर (प्रतिनिधी) :** शिवाजी विद्यापीठाच्या गुणवत्तेवर आधारित शिष्यवृत्ती देण्याच्या अभिनव उपक्रमात शहरी विभागातून विवेकानंद कॉलेजने यावर्षी प्रथम क्रमांक पटकाविला आहे. सलग २१ वर्षे विवेकानंद महाविद्यालयाने गुणवत्तेची परंपरा कायम राखली आहे. विद्यापीठाच्या वतीने ३ सप्टेंबर रोजी पदार्थ विज्ञान अधिविभाग सभागृहात आयोजित शिष्यवृत्ती गुणगौरव समारंभात प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर यांचा सत्कार कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते होणार आहे.

# ‘पोर्तुगीजमध्ये करिअरच्या संधी’

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

‘पोर्तुगीज भाषेतील ज्ञान व कौशल्य युवकांना करिअरच्या अनेक संधी उपलब्ध करुन देऊ शकते. पोर्तुगीज भाषेचे अभ्यासक्रम सुरू करणारे शिवाजी विद्यापीठ हे महाराष्ट्रातील एकमेव आहे’ असे प्रतिपादन गोवा विद्यापीठातील पोर्तुगीज भाषा विभागप्रमुख डॉ. डेल्फीम कोरेईया द सिल्वा यांनी केले. शिवाजी विद्यापीठातील विदेशी भाषा विभागाच्या सुवर्णमहोत्सवी वर्षाचे औचित्य साधून यंदापासून पोर्तुगीज भाषा प्रमाणपत्र अभ्यासक्रम व जपानी भाषा पदविका अभ्यासक्रम सुरू केले आहेत. डॉ. सिल्वा यांच्या हस्ते आणि शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या अध्यक्षतेखाली अभ्यासक्रम वर्गाचे उद्घाटन झाले.

तत्पूर्वी उपस्थितांच्या हस्ते रोपांची लागवड करण्यात आली. डॉ. सिल्वा यांनी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांसोबत संवाद साधला. ‘भारत-पोर्तुगाल संबंध, पोर्तुगीज भाषा व करिअर संधी’ या विषयावर त्यांचे व्याख्यान झाले.

डॉ. सिल्वा म्हणाले, ‘भारत व पोर्तुगाल या दोन राष्ट्रांतील संबंध २१ व्या शतकात नव्या पर्वावर पोहोचले आहेत. सरकारी पातळीवर सामंजस्य करार झाले आहेत. व्यापाराची देवाण-घेवाण होते.



शिवाजी विद्यापीठात पोर्तुगीज भाषा अभ्यासक्रम उद्घाटनप्रसंगी प्र कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के व डॉ. डेल्फीम कोरेईया द सिल्वा यांच्या हस्ते वृक्ष लागवड करण्यात आले. सोबत ऐश्वर्या चव्हाण, डॉ. भारती पाटील, डॉ. मेघा पानसरे, डॉ. नंदा पारेकर, शीतल कुलकर्णी आदी.

## विदेशी भाषा विभागात अभ्यासक्रम सुरू

पोर्तुगीज संस्कृतीचा गोव्यावर विशेष प्रभाव आहे. वास्तूशिल्प, पाककला, सांस्कृतिक क्षेत्रावरही प्रभाव आढळतो. पोर्तुगालमध्ये मोठ्या संख्येने भारतीय आहेत. त्यामुळे या दोन देशांमध्ये परस्पर संवाद, व्यापार व्यवसायाची देवाण-घेवाण आहे. विद्यापीठातील पोर्तुगाल अभ्यासक्रमामुळे भाषेच्या ज्ञानासोबतच करिअरच्या संधी उपलब्ध होणार आहेत.’

प्र-कुलगुरू शिर्के यांनी विद्यापीठातील मार्गदर्शन केले. चॉइस बेस्ड क्रेडिट कोर्स अभ्यासक्रम शिकण्याच्या प्रक्रियेतर्गत पोर्तुगीज भाषेचाही समावेश असावा अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. कला व सामाजिक शास्त्र शाखेच्या अधिष्ठाता डॉ. भारती पाटील, शिक्षिका ऐश्वर्या चव्हाण यांनीही मनोगत व्यक्त केले. विदेशी भाषा विभागप्रमुख डॉ. मेघा पानसरे यांनी प्रास्ताविक केलेपुढील वर्षापासून फ्रेंच भाषा अभ्यासक्रमाची सुरुवात होईल असे त्यांनी सांगितले. शीतल कुलकर्णी यांनी आभार मानले. डॉ. नंदा पारेकर, डॉ. निलांबरी जगताप, डॉ. मंजुश्री पवार उपस्थिती होती.

# जबाबदारीने नेतृत्व केल्यास यश निश्चित

## डॉ. डी. के. गायकवाड; विद्यापीठात ‘यिन संवाद’ कार्यक्रमास तरुणाईचा प्रतिसाद

YOUNG INSPIRATORS NETWORK
Inspire. Network. Deliver

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. ३१ : ‘जबाबदारी घेऊन नेतृत्व करायला शिकलात तर आयुष्यात तुम्ही यशस्वी व्हाल,’ असा कानमंत्र शिवाजी विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे समन्वयक डॉ. डी. के. गायकवाड यांनी स्वयंसेवकांना दिला. शिवाजी विद्यापीठात आयोजित ‘यिन संवाद’ कार्यक्रमात ते बोलत होते.





**कोल्हापूर : ‘यिन संवाद’ कार्यक्रमात बोलताना राष्ट्रीय सेवा योजनेचे समन्वयक डॉ. डी. के. गायकवाड. दुसऱ्या छायाचित्रात उपस्थित स्वयंसेवक.**

या वेळी त्यांनी समाज सेवा करताना अहंकार नाहीसा होतो, असे सांगत विविध उदाहरणांसह स्वयंसेवकांना व्यक्तिमत्त्व घडविण्याची ऊर्जा दिली. एक हजार २०० स्वयंसेवकांच्या उत्स्फूर्त प्रतिसादात लोककला केंद्रात कार्यक्रम झाला.

डॉ. गायकवाड म्हणाले, ‘‘राष्ट्रीय सेवा योजना व्यक्तिमत्त्वाला आकार देणारी आहे. योजनेत झोकून देऊन काम करत स्वत:ला घडवा. श्रमदानातून व्यक्तिमत्त्व घडत असते. त्यासाठी सर्व स्वयंसेवकांना त्यांच्यातील एकता सिद्ध करावी लागते. ती योग्यता प्राप्त केल्यानंतर स्वयंसेवकांत एकरूपता येते आणि ते एकमेकाला सन्मान द्यायला शिकतात. या योजनेत सहभागी होऊन करिअरचा मार्ग सोपा करण्याची संधी तुम्हाला मिळाली आहे. तिचे सोने करण्याची जबाबदारी तुमची आहे.’’

ते म्हणाले, ‘‘योजनेत सहभागी झालेले अनेक जण शासनाच्या विविध खात्यांत अधिकारी आहेत. त्यांनी स्वत:ची ओळख निर्माण केली आहे. तुमचे अस्तित्व काय, असे कोणी तुम्हाला विचारले तर ते सांगता आले पाहिजे. त्याची मशागत करण्याची हीच वेळ आहे. सेवा केली की अहंकार नाहीसा होता, हे सूत्र लक्षात ठेवून वाटचाल करा.

स्वच्छतेचे व्रत घेऊन काम करा. लोक भावना तुमच्या पाठीशी राहील. समाजात परिवर्तन घडविण्यासाठी या योजनेचा पुरेपूर फायदा करून घ्या, असेही त्यांनी सांगितले.’’ या वेळी स्वयंसेवकांनी अंगभूत कौशल्ये सादर करत उपस्थितांची दाद मिळविली.

‘यिन’चे समन्वयक अवधूत गायकवाड व सूरज चव्हाण यांनी संयोजन केले.

पुढारी

# विद्यापीठ आयएसओ मानांकन पाहणी पूर्ण

कोल्हापूर : प्रतिनिधी

शिवाजी विद्यापीठाला नॅक समितीच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार आयएसओ मानांकन मिळण्यासाठी आवश्यक असलेल्या निकषांची पाहणी प्रक्रिया पूर्ण झाली. टीव्हू सूद या जर्मन कंपनीच्या वतीने या मानांकनासाठी त्रयस्थ यंत्रणेद्वारे पाहणी करण्यात आली.

आयएसओ मानांकनासाठी असलेल्या निकषांच्या कक्षेत शिवाजी विद्यापीठ येते का, हे पाहण्यासाठी गेल्या दोन दिवसांपासून चार सदस्यीय समितीच्या वतीने पाहणी करण्यात आली. शुक्रवारी ही पाहणी पूर्ण झाली असून अद्याप समितीने अधिकृत निर्णय जाहीर केलेला नाही. या पाहणीमध्ये विद्यापीठाचे सर्व डाक्युमेंटस्, इफेक्टिव्हनेस व इफिशिएन्सी या दोन गोष्टी सखोलपणे तपासण्यात आल्या.




शिवाजी विद्यापीठाला सध्या नॅकचा 'अ' दर्जा आहे. कृषी विद्यापीठाच्या रँकमध्येही विद्यापीठ अव्वल आहे. एनआयआरएफच्या क्रमवारीत दोन वर्षांपूर्वी विद्यापीठाचा २८ वा क्रमांक होता. गेल्या दोन वर्षांपासून आयएसओ मानांकन मिळवण्यासाठी शिवाजी विद्यापीठाच्या वतीने विशेष तयारी सुरू होती. तसेच नॅक समितीनेही आयएसओ मानांकन मिळवण्याच्या सूचना विद्यापीठाला केल्या होत्या. नॅकच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार विद्यापीठाच्या शैक्षणिक दर्जा सुधारणामध्ये आयएसओ मानांकन महत्त्वाचे आहे.